श्रीसमर्थांचे

मनाचे श्लोक





श्रीसमर्थांचे मनाचे श्लोक

लेखन व संकल्पना
गुरुदास

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- लेखन व संकल्पना : गुरुदास

- मुखपृष्ठ : बी.आर. कुलकर्णी

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंडस्ट्रियल इस्टेट, लालबाग, मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

मनाचे श्लोक: एक चिंतन

श्रीसमर्थ रामदास यांचं संतत्व जसं अलौकिक आहे तसंच त्यांचं कवित्वही मोठं अपूर्वाईचं आहे. दासबोध, जुना दासबोध, मनोबोध तथा मनाचे श्लोक, स्फुट काव्य, अभंग, करुणाष्टकं, रामायण, आत्माराम ही अध्यात्मपर चिंतनाची बहुमोल काव्यरचना अशी समर्थांची विपुल ग्रंथसंपदा आज आपल्याला उपलब्ध आहे. अर्थात ती उपलब्ध करुन देण्यासाठी अनेक समर्थभक्तांनी, ज्ञानी जनांनी, समर्थ संप्रदायातील अभ्यासकांनी आणि साहित्य संशोधकांनी अपार कष्ट केले आहेत. अथक प्रयासांनी ही संपदा त्यांनी मिळवली आहे.

समर्थ साहित्याची ही मोठी खाण आज आपल्या हाती आली असली तरी समर्थांच्या अप्रकाशित साहित्याचं भांडारही खूप अपार आहे, असं समर्थ साहित्याचा वेध घेणाऱ्या जिज्ञासूंचं व संशोधकांचं म्हणणं आहे. अर्थात हे भांडार जेव्हा केव्हा प्रकाशित होऊन आपल्या हाती लागेल तो खरोखरीच सुदिन म्हणावा लागेल.

समर्थांच्या एकूण ग्रंथसंपदेपैकी ज्या रचनांना अखंड लोकप्रियता लाभली त्यात 'दासबोध' या ग्रंथाचा अग्रक्रम आहे. अर्थात 'दासबोध' हा समर्थांच्या प्रपंच-परमार्थ विषयक तत्वज्ञानाचा विस्तृत असा ग्रंथराज आहे आणि ओवी संख्येने तो खूप मोठा आहे. कारण दासबोधाच्या वीस दशकातील एकूण ओवी संख्या ७७५२ इतकी आहे. दासबोध हा समर्थांचे एकूण तत्वज्ञान सुबोधपणे सांगणारा ग्रंथ आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही विषयांवर समर्थांनी केलेले भाष्य या ग्रंथात नमूद झालेलं आहे. खरं तर हरिकथा निरुपण, राजकारण, सर्वसावधपण आणि अत्यंत साक्षेप या आपल्या चतु:सूत्रीवरच समर्थांनी दासबोधात विस्ताराने विचार मांडले आहेत.

दासबोधा खालोखाल सर्वाधिक लोकप्रियता लाभली आहे ती समर्थांच्या 'मनोबोध' तथा 'मनाचे श्लोक' या काव्याकळेला. 'दासबोध' हा समर्थांच्या एकूण तत्वज्ञानाचा ग्रंथराज असला तरी 'मनाचे श्लोक' तथा मनोबोध हा या तत्वज्ञानाचा सूत्ररुप सत्वसार आहे. मनाचे श्लोक म्हटले की, काही काव्यपंक्ती अगदी आपोआप बोधवचनांसारख्या आपल्या ओठी खेळू लागतात. आणि जे जे म्हणून या श्लोकांचं श्रद्धेने, निष्ठेने नित्य श्रवण-पठण करतात त्यांच्या मनावर हे श्लोक इतके दृढपणे ठसून बसतात की, ही बोधवचने त्यांच्या आयुष्याचीच सूत्रे बनून जातात. उदाहरणादाखल पुढील काही काव्यपंक्तींचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करता येईल.

एक : मना सज्जना भक्तिपंथेची जावे ।

दोन : तनु त्यागिता कीर्ती मागे उरावी ।

तीन : जनी निंद्य ते सर्व सोडोनी द्यावे ।
जनी वंद्य ते सर्वभावे करावे ।।

चार : जगीं सर्व सूखी असा कोण आहे ।

पाच : मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढें जात आहे ।।

सहा : घडे भोगणे पाप ते कर्म खोटे ।

सात : प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।

आठ : मना सत्य ते सत्य वाचें वदावे ।

नऊ : दिनानाथ हा राम कोदंडधारी ।
पुढे देखता काळ पोटी थरारी ।।

दहा : नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।

अकरा: **समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।**
असा सर्व भूमंडळी कोण आहे ।।

बारा: **सदा सर्वदा राम सन्निध आहे ।**

तेरा: **मुखी राम त्या काम बाधू शकेना ।**

चौदा: **रिता ठाव या राघवेवीण नाही ।**

'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' या दोन्ही काव्य- रचनांचा भक्ती हाच पाया असला तरी संवाद, संभाषण हे या दोन्ही काव्यग्रंथांचे मुख्य लक्षण आहे. फरक इतकाच आहे की, दासबोधातील संवाद हा गुरु-शिष्य संवाद आहे तर 'मनाचे श्लोक' हा मनाशी साधलेला संवाद आहे. एक प्रकट संवाद आहे तर दुसरा आंतरिक संवाद आहे. तो नाटकातील स्वगतासारखा आहे. मनाने मनाशीच केलेले ते संभाषण आहे. त्यामुळेच मनाचे श्लोक श्रवण-पठण करणाऱ्याशी अगदी जवळीक साधतात. थेट हृदयाला जाऊन भिडतात.

मन चंचल आहे हा तर आपला नित्याचाच अनुभव असतो. शाळेत शिक्षक मोठ्या काकुळतीने शिकवत असतात पण आपलं मन मात्र त्यावेळी शाळेबाहेर असतं. ते खेळगड्यांच्या आठवणीत रंगलेलं असतं किंवा घरी गेल्यानंतर काय काय उद्योग करायचे याबद्दलच्या मनसुब्यात गढलेलं असतं. तर घरी जेवण करताना गृहपाठाचा विचार करीत असतं. खेळाच्यावेळी आणखी तिसराच विचार असतो. ज्यावेळी जो विचार करायला हवा, तो करणं मनाला आवडत नाही. त्यामुळेच माणूस आयुष्यात नको ते प्रसंग, नको ती संकटं आपल्यावर ओढवून घेतो. त्यातून शेवटी, दुःख, वेदना, पश्चातापच पदरी येतो. आनंद मिळतच नाही. तो सतत मिळवायचा असेल, मनाच्या चंचल स्वभावामुळे पदरी येणाऱ्या दुःखभोगातून सुटका करायची असेल तर प्रथम आपलं मन आपण एकाग्र करायला शिकलं पाहिजे. ओढाळ, गाईगुरांप्रमाणे इथेतिथे भटकणारं

मन एके ठिकाणी एकचित्त करायला हवं. त्यासाठी ते संस्कारित करायला हवं. समर्थ रामदास यांनी रचलेल्या मनाच्या श्लोकांमुळे आपलं ओढाळ मन सुसंस्कारित होऊ शकतं. कारण त्यातील आशय हा समर्थांचा स्वानुभव आहे.

बालमित्रांनो, समर्थ रामदासांचं एकूण चरित्र जर आपण अभ्यासलं तर त्यांनी आपल्या मनाची जडणघडण कशी निर्धारपूर्वक आणि दृढनिश्चयाने केली याचं सुंदर चित्र आपल्या डोळ्यांपुढे स्वच्छपणे उभं राहतं.

समर्थांना वयाच्या सातव्या वर्षी साक्षात प्रभु रामचंद्रानेच अनुग्रह देऊन गुरुमंत्र दिला होता. प्रभु रामचंद्र हेच त्यांचे कुलदैवत आणि सद्‌गुरु होते. पण एवढ्या कमाईने ते संतुष्ट झाले नाहीत. देवदर्शनाचा आणि गुरुमंत्राचा आनंद सदा सर्वकाळ उपभोगता यावा, त्याचं परमानंदात रुपांतर करता यावं म्हणून त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षी गृहत्याग केला. नंतरची बारा वर्षे त्यांनी तपश्चर्या केली. त्यासाठी एकांतवास केला. या एकांतवासात त्यांचं मन हेच त्यांचं सखासांगाती होतं. त्याच्याशीच त्यांचा सतत संवाद होता. त्यामुळे मनाला त्यांनी जितकं जवळून अनुभवलं होतं तितकंच त्याला दुरुनही त्रयस्थपणे जाणलं होतं. बारा वर्षांच्या साधना काळात आपलं मन पूर्ण राममय करण्याच्या मार्गात त्यांनी मनाची जी व्याकुळता अनुभवली ती खरोखरीच अपूर्वाईची होती. समर्थांनी या साधना काळात रचलेल्या करुणाष्टकात ती खूप आर्तपणे व्यक्त झालेली आहे. पुढील काही ओळी या आर्ततेची साक्ष देतील.

एक : **अचपळ मन माझें नावरे आवरितां ।**
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ।।

दोन : **चपळपण मनाचे मोडितां मोडवेना ।**
सकळ स्वजनमाया तोडितां तोडवेना ।।

तीन: जळत ह्रदय माझें जन्म कोट्यानकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी ।।

चार: सुख सुख म्हणतां हें दु:ख ठाकूनि आलें ।
भजन सकळ गेलें चित्त दुश्चीत झाले ।।

करुणाष्टकात समर्थ रामदासांनी व्यक्त केलेला हा जिवाचा आकांत ओढाळ मनाला रामाचे ठायी स्थिर करण्यासाठी मांडलेला आहे. तो स्वानुभवातून आलेला आहे. पुन्हा तो गुरुकडून अनुग्रह झाल्यानंतरच्या साधकावस्थेतला आहे. मग तुमच्या आमच्या मनाची अवस्था काय असू शकते, याचा अंदाज बांधणे फार फार कठीण. मनाशी असा संवाद साधून त्याची अशी समर्थांसारखी झाडाझडती घेणं तर आपल्याला खूप खूप कष्टकारक. समर्थांनी आयुष्यभर मनाशी असा संवाद साधलेला आहे. त्यास वारंवार पारखून घेतलं आहे आणि त्याचबरोबर स्वत:च्या मनाबरोबर विश्वमनाचाही वेध घेतला आहे. ‘मनोबोध’ किंवा ‘मनाचे श्लोक’ हे या अशा चिंतनातून रचले गेले आहेत.

मनाच्या श्लोकांच्या शेवटी समर्थांनी या श्लोकांची फलश्रुती सांगितली आहे, आणि ती समर्थांनी वचनपूर्वक सांगितलेली आहे, म्हणजे ती स्वयंसिद्ध आहे हे सांगायला नको. ही फलश्रुती अशी:

मनाची शतें ऐकता दोष जाती ।
मतीमंद ते साधनायोग्य होती ।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्ये अंगी ।
म्हणे दास विश्वासता मुक्ती भोगी ।।

या श्लोकातील शब्द सोपे आहेत. त्यामुळे त्याचा अर्थ लावणेही तसे सोपे आहे. या श्लोकाचा सोपा अर्थ असा की, मनाचे श्लोक नित्य म्हटले, पाठ केले किंवा श्रवण केले तर मनाला जे जे दोष वेढून असतात ते दूर होतात.

मनाचे श्लोक म्हणजे भावपूर्ण काव्य आहे. त्यातील देवभाव, भावनांचा ओघ, भाषेचे सोपेपण, ओघवते शब्द, मनाचा ओलावा यामुळे या श्लोकांची खुमारी काही वेगळीच आहे. असेच आंतरिक सौंदर्य समर्थांच्या करुणाष्टकांना लाभलेलं आहे. त्यातील हळवेपण तर मनाच्या श्लोकांपेक्षाही गढद आहे. गहिरं आहे. श्रीरामाच्या दर्शनासाठी आतूर झालेल्या जिवाचा तो आर्त टाहो आहे. त्यात व्याकुळतेची परमावधी आहे. अर्थात करुणाष्टकांचा विषय वेगळा आहे.

मनाच्या श्लोकांना 'भुजंगप्रयात' वृत्ताचा गोडवा लाभलेला असल्याने त्यांची खुमारी खूप हृदयस्पर्शी आहे. या छंदामुळे या श्लोकांना गेयता लाभलेली आहे. समर्थांना काव्याइतकीच संगीताचीही उत्कृष्ट जाण होती, हे या श्लोकातील लयबद्ध शब्दरचनेतून जाणवतं. समर्थांनी रचलेल्या आरत्यांमध्येही ही उत्कट लय आहे. त्यामुळेच मनाचे श्लोक मनाला आणि हृदयाला व्यापून टाकतात. भावनेला उंच पातळीवर नेऊन पोहोचवतात. या काव्यगुणांमुळेच मनाच्या श्लोकांनी गेल्या अनेक पिढ्यांवर आपला अमीट ठसा उमटवलेला आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचे भावजीवन संस्कारित केले आहे.

समर्थांच्या काळात आणि त्यानंतरही **'जय जय रघुवीर समर्थ'**, असा श्रीरामाचा जयजयकार करुन समर्थांचा शिष्य-परिवार व साधक गावोगावी हिंडत व घरोघरी भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत. संप्रदायातर्फे जे जे म्हणून देवधर्माचे, उत्सव-सोहळ्याचे कार्य पार पाडले जाई त्यासाठी असेच सामूहिक भिक्षाटन करुन अन्नधान्य व निधी झोळीतून गोळा केला जात असे. स्वतः समर्थांनी असे अनेक उत्सव अशा सामूहिक भिक्षाटनातून उत्तमपणे साजरे केले होते. या भिक्षाटनाच्यावेळी मनाचे श्लोकांपैकी प्रत्येक घरी एकेक श्लोक म्हणून व श्रीरामाचा जयजयकार करुन भिक्षा मागण्याचा नित्यक्रम असे. हेतू हा की, या श्लोकांच्या नित्य श्रवणाने प्रपंचात खोल रुतून बसलेल्या सर्वसामान्य लोकांचं चित्त परमार्थाकडे वळावं. त्यांची मनं देव-धर्माकडे हळूहळू वळावी. त्यातून

सदाचारसंपन्न समाज निर्माण व्हावा आणि अशा सदाचारी समाजाची लोकशक्ती राष्ट्रकार्यामागे ठामपणे उभी रहावी. एका परीने लोकांची मनं विकार-वासना, भयगंड-न्यूनगंड, संकुचितपणा अशा पातळीवरुन वर उठून ती सत्कारणी लागावी व लोकजागरण व्हावं या हेतूनेच या श्लोकांची रचना समर्थांनी केली असावी असं दिसतं. म्हणूनच कदाचित मनाचे श्लोकांची रचना अधिक ह्रदयस्पर्शी व सर्वसामान्यांचे लक्ष वेधून घेणारी ठरली असावी असं वाटतं.

मनाचे श्लोकांचं पठण-श्रवण करताना आपल्याला प्रकर्षाने आकर्षून घेतो तो मनाशी केलेला संवाद. हा संवादही मोठा हळुवार आहे. त्यात उपदेश करण्याच्या भूमिकेपेक्षा आर्जव अधिक आहे. आई आपल्या खट्याळ व अवखळ मुलाशी "अरे बाबा ! असं करु नकोस-तसं कर" या भाषेत जवळीक साधून जशी चार भल्या गोष्टी मुलाच्या मनावर ठसविते, अगदी त्याच भूमिकेतून समर्थ द्वाड, अवखळ मनाला समजुतीच्या भाषेत जवळ घेऊन, कुरवाळून चार सुखाच्या गोष्टी सांगत आहेत असं वाटतं. मनाचं कल्याण व्हावं ही कळकळ असल्याने भाषेत कळवळा आहे. व्याकुळता आहे. जिव्हाळा असल्याने सलगी आहे.

रामदास म्हणजे श्रीरामाचा सदासर्वकाळचा दास. समर्थ हे आयुष्यभर रामदासच राहिले आणि रामदास या नावानेच मिरवले. रामाच्या ठायी असलेला हा जो उत्कट दास्यभाव आहे तसेच श्रीरामाबद्दलचा जो पराकोटीचा अनन्यभाव समर्थांच्या ह्रदयात सतत वाहता राहिला आहे, त्याचं मनोज्ञ दर्शन आपल्याला मनाचे श्लोकातून होतं. श्रीरामाबद्दलचा त्यांचा हा अपार भक्तीभाव देह-मनाचे अवघे बांध फोडून दुथडी भरुन वाहणाऱ्या नदीसारखा या श्लोकातून आपल्याला अखंड वाहताना दिसतो. म्हणूनच "मनाचे श्लोक" या समर्थांच्या साहित्यकृतीची अपूर्वाई काही वेगळीच आहे असं आपल्याला जाणवतं. त्यांच्या श्रवण-पठणाने मनाचा मळ दूर होऊन मन निरभ्र होते.

मनाचे श्लोक एकूण २०५ आहेत. त्यापैकी पहिले ६६ श्लोक सर्वांना परिचित आहेत. कारण त्यापैकी पुढील अनेक श्लोक बहुधा प्रसंगोपात कानावर पडत असतात. **(१) नुपेक्षी कदा राम दासाभिमानी** (श्लोक २८ ते ३७) **(२) जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा** (श्लो. ४७ ते ५६), **(३) प्रभाते मनी राम चिंतीत जावा** (श्लो. ६७ ते ७६), **(४) नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी** (श्लो. ११६ ते १२५) हे प्रत्येकी दहा-दहा श्लोक तसेच **(५) मना सज्जना राघवी भक्ती कीजे** (श्लो. ३८-४२) हे पाच आणि **(६) तुटे वाद संवाद** (श्लो. १०८ ते ११२) हे पाच असे एकूण ५० श्लोक सबेल श्लोक म्हणून सुपरिचित आहेत. पाठांतरासाठी ते सोपे आहेत. प्रारंभीचे १ ते ३७ आणि नंतर ५० सबेल श्लोक असे एकूण ८७ श्लोक जरी सुरुवातीला गटागटाने पाठ केले किंवा श्रवण केले तरी अगदी अल्पावधीत ते मुखोद्गत होऊ शकतात. त्यानंतर उरलेले श्लोकही क्रमाक्रमाने १०-१० श्लोकांचा गट करुन पाठ करता येतील.

या श्लोकांचे मनन-पठण केले असता वाणी स्वच्छ, शुद्ध तर होतेच शिवाय त्यांच्या पठण-श्रवण-मनन चिंतनाने कोणतीही इतर साधना न करता मनाचे सर्व दोष दूर होतात. ते निरोगी होते व मनाच्या व्यापारांमुळे माणसाला जी बंधनं बाळगावी लागतात, जे दुःख आणि कष्ट सोसावे लागतात त्यातूनही मनाची मुक्तता होते. मनाला मुक्तीचा परमानंद लाभतो. म्हणजेच आंतरिक सुख, समाधान व आनंद लाभतो. मनाची नकारात्मकता दूर जाते. हा अनेकांचा अनुभव आहे. आणि स्वतः श्रीसमर्थांनीच मनाचे श्लोकातील अखेरच्या श्लोकात तसा स्पष्ट निर्वाळा दिलेला आहे. त्यामुळेच मनावर संस्कार घडविण्याचे केवढे अपार सामर्थ्य या श्लोकात दडलेले आहे ते वेगळे सांगायला नको.

- गुरुदास